# MAHARASHTRA ACT No. XXII OF 1982

## THE MAHARASHTRA TAXATION LAWS OFFENCES (EXTENSION OF PERIOD OF LIMITATION) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती, दिनांक ४ जून १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोबे,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXII OF 1982

## AN ACT TO PROVIDE FOR EXTENSION OF THE PERIOD OF LIMITATION FOR TAKING COGNIZANCE OF OFFENCES UNDER CERTAIN TAXATION LAWS OF THE STATE OF MAHARASHTRA

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक १० जून १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२

### महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित कर आकारणीविषयक कायद्यांखालील अपराधांची दखल घेण्यासाठी असलेल्या मुदतीत वाढ करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** विवक्षित अपराधांची न्यायालयांकडून दखल घेतली जाण्याची मुदत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४६८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित कर आकारणीविषयक कायद्यांखालील अपराधांना लागू असलेल्या मुदतीत वाढ करण्यासाठी तरतूद करणे व त्यांस आनुषंगिक असलेल्या बाबींसंबंधात तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कर आकारणीविषयक कायद्यांखालील अपराध (मुदतीत वाढ) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या तारखेस अमलात येईल.

महाराष्ट्राच्या विवक्षित कर आकारणी-विषयक कायद्यांखालील अपराधांची दखल घेण्यासाठी वाढीव मुदत.

२. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४६८ च्या पोट-कलम (२) मध्ये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमितींअन्वये शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधाची न्यायालयाकडून दखल घेण्याबाबत असलेली मुदत,— १९७४ चा २.

(अ) ज्या बाबतीत उक्त अपराधासंबंधात प्रदत्त किंवा देय कराची किंवा शुल्काची एकूण रक्कम पंचवीस हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर तीन वर्षे असेल ; आणि

(ब) इतर प्रकरणी ती एक वर्ष असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, उक्त संहितेच्या [त्यातील कलम ४६८, पोट-कलम (३) चा अंतर्भाव करून] प्रकरण छत्तीसचे उपबंध, उक्त संहितेच्या कलम ४६८ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या इतर अपराधांना ज्याप्रमाणे ते लागू होतात त्याप्रमाणे, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अपराधांची दखल घेण्यासाठी लागू होतील.

## अनुसूची

(कलम २ पहा)

१. मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ (१९२३ चा मुंबई १).

२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०).

३. महाराष्ट्र जाहिरातींवरील कर अधिनियम, १९६७ (१९६७ चा महाराष्ट्र १८).

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.